# मुंबई विद्यापीठ

परीक्षा विभाग / निकाल कक्ष,
दुसरा मजला,
छत्रपती शिवाजी महाराज भवन.
मुंबई विद्यापीठ, विद्यानगरी,
मुंबई ४०० ०९८.

**क्र.परीक्षा / परीक्षा अर्ज / निकाल कक्ष / ५९८ / २०२६, दि. ०४ ऑगस्ट, २०२६**

परिपत्रक :—

विद्यापीठाच्या विविध शैक्षणिक विभागांचे संचालक / प्रमुख, संलग्नित / संचालित महाविद्यालयांचे प्राचार्य, मान्यताप्राप्त संस्थांचे संचालक / प्रमुख, दूरस्थ व ऑनलाइन शिक्षण केंद्राचे प्राध्यापक नि संचालक, विद्यापीठाच्या रत्नागिरी, सिंधुदुर्ग, ठाणे व कल्याण उपकेंद्राचे समन्वयक व सहायक कुलसचिव यांना या परिपत्रकाद्वारे सुचित करण्यात येते की, **महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम-२०१६** च्या तरतुदीनुसार विद्यापीठाने परीक्षांचे निकाल वेळेवर जाहिर होण्याकरीता परीक्षांच्या पध्दतीमध्ये काही अमुलाग्र बदल करण्याचे ठरविले आहे. परीक्षांचे निकाल वेळेवर जाहिर होण्याकरीता विद्यापीठाच्या या धोरणास सकारात्मक प्रतिसाद देणे अपेक्षित असून विद्यापीठाने बदललेल्या प्रक्रियेची विद्यार्थी व महाविद्यालयांनी काटेकोरपणे अंमलबजावणी करणे आवश्यक आहे.

उपरोक्त धोरणानुसार शैक्षणिक वर्षे **२०२६-२७** मधील **हिवाळी -२०२६ (द्वितीय सत्र २०२६)** मध्ये होणाऱ्या परीक्षांच्या विद्यार्थ्यांचे परीक्षा प्रवेश अर्ज विहित फीसह M.K.C.L. या अभिकरणामार्फत (Digital University Portal) mum.digitaluniversity.ac वरून Online घेण्यात येणार आहेत.

परीक्षा प्रारंभ व परीक्षा प्रवेश अर्ज स्विकारण्याच्या तारखांचा तपशील विद्यापीठाच्या संकेतस्थळावर देण्यात आला आहे.

परीक्षा प्रवेश अर्ज स्विकारण्याच्या शेवटच्या दिवशी **सायंकाळी ५.०० वाजता** Inward Link आपोआप बंद होणार असल्यामुळे परीक्षा प्रवेश अर्ज Inward करता येणार नाहीत व परीक्षा प्रवेश अर्ज स्विकारण्याची मुदत कोणत्याही परिस्थीतीत पुन्हा वाढवून दिली जाणार नाही या बाबींची नोंद घेण्यात यावी.

विद्यार्थ्यांचे परीक्षा अर्ज जमा करण्यापूर्वी महाविद्यालयांनी संबंधीत विद्यार्थ्यांचे छायाचित्र, स्वाक्षरी, नाव (मराठी व इंग्रजी या दोन्ही लिपीत), माध्यम, विषय व दिव्यांग (Person with disability) इ. बाबी बरोबर आहेत, याची खात्री करून घ्यावी. सदर माहिती गुणपत्रिका व पदवी प्रमाणपत्र यासाठी वापण्यात येणार आहे. परीक्षा अर्ज जमा झाल्यावर वरील कोणतीही दुरूस्ती करता येणार नाही, याची सर्व संबंधीतांनी नोंद घ्यावी.

परीक्षा अर्ज स्विकारण्याच्या अंतिम तारखेनंतर कोणत्याही परिस्थितीत परीक्षा अर्ज स्विकारण्याची मुदत वाढवून दिली जाणार नाही याची सर्व संबंधीतांनी नोंद घ्यावी. तसेच यासंदर्भात प्रशासनातील वरीष्ठांकडे विनंती करून त्यांचा अमुल्य वेळ वाया घालवू नये ही विनंती.

..२..

तरी या परिपत्रकामध्ये नमुद असलेल्या सर्व बाबींचे तंतोतंत पालन करण्यात यावे.

स्थळ : मुंबई
दि. : ०४ ऑगस्ट, २०२६

(डॉ. पूजा रौंदळे)
संचालिका
परीक्षा व मूल्यमापन मंडळ

प्रति,

विद्यापीठाच्या विविध शैक्षणिक विभागांचे संचालक / प्रमुख, विद्यापीठाशी संलग्नित / संचालित महाविद्यालयांचे प्राचार्य, मान्यताप्राप्त संस्थाचे संचालक / प्रमुख, दूरस्थ व ऑनलाइन शिक्षण केंद्राचे प्राध्यापक नि संचालक, विद्यापीठाच्या रत्नागिरी, ठाणे व कल्याण उपकेद्रांचे समन्वयक/संचालक

**अ. प्रत माहितीस्तव व योग्य कार्यवाहीसाठी अग्रेषितः-**

१. संचालक, माहिती आणि संप्रेषण तंत्रज्ञान विभाग, परीक्षा विभाग, मुंबई- ४०० ०९८.
२. सर्व उपकुलसचिव, परीक्षा विभाग, मुंबई विद्यापीठ, मुंबई- ४०० ०९८.
३. उपकुलसचिव (नाव नोंदणी विभाग), डॉ. आंबेडकर भवन, मुंबई विद्यापीठ, मुंबई- ४०० ०९८.
४. उपकुलसचिव / मुख्य लेखापाल, वित्त व लेखा विभाग, परीक्षा विभाग, मुंबई- ४०० ०९८.
५. सर्व वरिष्ठ यंत्रणा नियोजक, केंद्रीय संगणक सुविधा विभाग, परीक्षा विभाग, मुंबई- ४०० ०९८.
६. सर्व सहायक कुलसचिव, परीक्षा विभाग, मुंबई विद्यापीठ, मुंबई- ४०० ०९८.
७. सर्व यंत्रणा परीचालन अधिकारी, केंद्रीय संगणक सुविधा विभाग, मुंबई- ४०० ०९८.
८. समन्वयक, MKCLपरीक्षा विभाग, मुंबई- विद्यापीठ, मुंबई- ४०० ०९८.

**ब. प्रत माहितीसाठी अग्रेषितः-**

१. मा. संचालक, विद्यार्थी कल्याण विभाग, मुंबई विद्यापीठ, मुंबई-४०० ०३२.
२. उपकुलसचिव (जनसंपर्क), परीक्षा विभाग, मुंबई विद्यापीठ, मुंबई- ४०० ०९८.
३. कुलगुरू यांचे स्विय सहायक, मुंबई विद्यापीठ, मुंबई- ४०० ०३२.
४. प्र. कुलगुरू / कुलसचिव / वित्त व लेखा अधिकारी / संचालक, परीक्षा व मुल्यमापन मंडळ यांचे स्विय सहायक

(डॉ. पूजा रौंदळे)
संचालिका
परीक्षा व मूल्यमापन मंडळ